**नि.दिवाणी दावा क्रं.१०६/२००८**
**नि. क्रं.१२७**

**:: प्रतिवादी क्र.२ व ३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. यु.सी. महाजन यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

०८. पंढरीनाथच्या पत्नीचे नाव सुशिलाबाई आहे आणि मुलींची नावे सोजरबाई आणि गोजरबाई आहेत. सोजरबाई ही पंढरीनाथची पत्नी नाही. मला शपथपत्रातील मजकूर आठवत नाही. त्यामुळे त्यात काय लिहिलेले आहे हे मी सांगू शकत नाही.

०९. माझे लग्न केंव्हा झाले हे मला आठवत नाही. परंतु माझ्या वयाच्या १६ व्या वर्षी लग्न झाले होते. मी माझ्या लग्नापासून माझ्या गावी बोळेगाव येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मणपासून त्यांचे नातू तानाजी व शिवाजी ही त्यांच्या हिस्स्याची जमीन कसून खात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांच्या आणि चुलता नारायणच्या हिस्स्याची जमीन वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला कळते तेव्हापासून नारायण, लक्ष्मण आणि माझे वडील हे आपापल्या हिस्स्याची जमीन कसून खात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुरुवातीलाच माझे वडील, नारायण आणि लक्ष्मण यांना वेगवेगळी घरे दिलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नाच्या पूर्वीपासून माझे वडील, नारायण व लक्ष्मण हे आपापल्या घरात राहत होते. मला गावाकडच्या जमिनीबाबत माहिती आहेत. मला सदर जमिनीचा सर्वे क्रमांक, क्षेत्रफळ आणि चतु:सिमा सांगता

येत नाहीत. माझ्या जन्माच्या पूर्वी लक्ष्मण, नारायण आणि माझे वडील यांच्यामध्ये वाटण्या झाल्या, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रामध्ये वाटण्या झालेल्या नसल्याबाबत चुकीचे लिहीले.

उलटतपास पूर्ण.

**:: प्रतिवादी क्र.१/१, १/२, ४ ते ११ हे व त्यांचे अधिवक्ता यांचा पुकारा केला असता ते गैरहजर आहेत. सबब उलटतपास नाही. ::**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.०६/०४/२०२६.